**MHSO130000061978**

## निशाणी क्र. ६३० वरील आदेश

वादी ने सदरचा अर्ज अबेटमेंट सेट असाईड व वारस रेकॉर्डवर घेण्याकरिता दिला आहे. त्यामध्ये त्यांचे असे कथन आहे की, सदरचा दावा दाखल झाल्यानंतर दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी नं.१अ मंदाकिनी लिंबराज जाधव या दिनांक २३/०१/२०२० रोजी लातुर येथे व प्रतिवादी नं.४ गोविंद नरसिंग बारंगुळे हे दिनांक २१/०९/२०२० रोजी बार्शी येथे मयत झाले आहेत. त्यामुळे मयत प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर घेवून दाव्याचे काम पुढे चालणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. वादीस कोरोना महामारीमुळे मुदतीत मयताचा दाखला मिळविता आला नाही त्यामुळे मुदतीत दुरुस्ती करता आली नाही. त्यामुळे त्यांना सदरचे वारस रेकॉर्डवर घेण्यास उशीर झालेला आहे. त्यामुळे दाव्यात तांत्रीक उणीव राहू नये म्हणून झालेला उशीर माफ होऊन व दाव्याचा गुणदोषांवर निकाल होणेसाठी अबेटमेंट सेट असाईड करुन मयतांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

२. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीस ऐकले. वादीने सदरचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होउन मिळणेकरिता व पृथक कब्जा मिळणेकरिता दाखल केला आहे. वादीने सदर प्रतिवादी नं.१अ व प्रतिवादी नं.४ यांचा मृत्यु झाला असल्याबाबत त्यांचे मृत्युचे दाखले निशाणी क्र.६२९ च्या यादीसोबत जोडलेले आहेत. त्यांची पाहणी केली असता त्यावर प्रतिवादी क्र.१अ या दिनांक २३/०१/२०२० रोजी तर प्रतिवादी क्र.४ हे दिनांक २१/०९/२०२० रोजी मयत झाले असल्याचे दिसून येते. वादीने सदर मयत प्रतिवादी क्र.१अ यांचे वारस दिनांक २२/०४/२०२० पर्यंत रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते परंतु, त्यांनी सदर प्रतिवादी क्र.१अ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास सुमारे ६ महिन्यांपेक्षा जास्त विलंब केला असल्याचे दिसून येते. सदरचा दावा प्रतिवादी क्र.१अ यांचे विरुध्द अबेट झालेला आहे.

३. जरी असे असले तरी, सदरचा दावा हा सन १९७८ साली दाखल झालेला असून वादी व प्रतिवादी यांचे हक्क हितसंबंध सदर दाव्यामध्ये गुंतलेले आहेत. त्यामुळे वादीचा सदरचा निशाणी क्र. ६३० चा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, वादीचा अर्ज निशाणी क्र.६३० रु.३००/- रुपयांच्या खर्चासह मंजूर करण्यात येतो व त्यांना मयत प्रतिवादी क्र.१अ व प्रतिवादी क्र.४ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी देण्यात येत आहे.

Digitally signed by Santosh Bholaram Vijaykar
Date: 2023.10.19 17:24:57 +0530

बार्शी (एस.बी. विजयकर)
दिनांक १९/१०/२०२३. सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.R. Barangule |
| (b) | Court | : | S.B. Vijaykar, Jt.C.J.J.D.&J.M.F.C. Barshi. |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 19/10/2023 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 19/10/2023 |